अंक ५ वा] [वर्ष २७ वें.

# "श्री साईलीला"

त्रैमासिक




जानेवारी, फेब्रुवारी, मार्च १९५०

वार्षिक वर्गणी रु. २-४-०

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २७ ] त्रैमासिक—जाने. फेब्रु. मार्च १९५० [ अंक ५ वा

## —: संपादकीय :—

संसारांत त्रस्त झालेल्या, संतांचा सहवास सुखदायक तर खराच पण ज्यांना तो घडला असेल व घडत असेल ते पुरुष भाग्याचे होत. आजच्या कलियुगांत संत साधु ओळखणें फार कठीण होऊन गेलें आहे त्यामुळेंच संत वाङ्मयाची गरज पावलोपावलीं जाणवत आहे.

मानव देहाची थोरवी अवर्णनीय आहे. या देहांतच जिवास आपलें सार्थक करून घेणें शक्य असल्यामुळें बहुत भाग्यानें लाभलेला हा नरदेह उकीरड्याचें घन न करतां सार्थकी खर्च घालावा.

संतांच्या अंतःकरणांत प्रेमामृताचा सांठा असतो व त्याला पान्हा फुटल्यावर अथरुपानें बाहेर पडतो. संतांच्या संगतींत राहिल्यानें आपण अनुभावानें शिकून शहाणे होतों व हेच अनुभव पुढील पिढीस प्रेमानें संतांकडे नेण्यास मार्गदर्शक होतात.

ज्या सत्तेनें हें विश्व चालतें समावतें ती सत्ता संतकृपेनें, संतप्रसादानें संतांच्या पायीं दृढ विश्वास ठेवल्यामुळें पान्हवणार आहे, व ती एकदां का पान्हवली मग साई-हरी प्रेमामृत पिण्यास नव्हे तर त्या अमृतांत डुंमत राहण्यास कितीसा उशीर लागेल !

प्रपंचरुपी महासागराच्या सुखदुःखाच्या लाटेवर भक्तांची नामनौका हेलकावे खात असते खरी पण भावाचें वल्हें हातीं शाबूत असल्यामुळें विषयाचे धोंडे चुकवून पैलतीरास वाट पहात असलेल्या ध्येयास अचुकपणें आणून सोडते.

पायाशिवाय इमारत उभारणें शक्य नाहीं त्याप्रमाणें भावाविना, प्रपंचाची अगर परमार्थाची इमारत टिकणार नाहीं. प्रत्येक कर्माची भावाविना अशीच अवस्था होते.

भावावीणें देव नयेची पैं हातां । वाउगें फिरतां रानोरान ॥
मुख्य तें स्वरुप पाहिजे तो भाव । तणें आकळे देव निःसंदेह ॥
संतसमागम नाम तें पावन । वाचे नारायण हाचि भाव ॥
एका जनार्दनीं सोपा मंत्र नाम । गातां जोडे धाम वैकुंठीचें ॥

भाव गांठीस असल्यास, आवडीचें मुद्दल शिलकीस असल्यास देव कांहीं दूर नाहीं.

नव्या जोमानें "श्रीसाईलीला" त्रैमासिक साईभक्तांकरतां निघून आज पुरीं दोन वर्षें होऊन गेलीं, परंतु त्याला अद्याप भाव मिळूं नये ! हृदयांत नाहींतर नाहीं पण बाजारांत तरी ! तो सुद्धां नाहीं !! आणि म्हणे साईभक्त !!! त्यांना जर अनुभवच आले नसतील तर ते तरी कुठून त्याचेवर भाव ठेवणार हो ! मग या साईबाबांचे कोणाला अनुभव आले, कोणाला साक्षात् भेटले, कोणाला स्वप्नांत दर्शन दिलें, कोणाच्या अंगांत आले, (खरें) अशा तऱ्हेचा गवगवा कांनीं ऐकूं येतो तो खोटाच का ? कीं आपली प्रौढी वाढविण्याकरतां व त्यांच्या नांवावर पैसा उकळण्याकरतां ? नशीब आमचें ! ज्या मनांत अपवित्र कल्पना, अंतःकरणांत संशयाच्या लहरी व चित्तांत ईश्वराबद्दल बेभरवसा त्या मनाच्या ठिकाणीं भुतांचा संचार होऊन, बाधा करूं शकतील व नाचूं शकतील. मग या भुतांचा नायनाट करण्याचा उपाय काढलाच पाहिजे. हरीबद्दल अविश्वास उत्पन्न होणें हेंच खरें महा महाभूत व नाना तऱ्हेच्या कल्पनांनीं मन गढूळ होणें हीच त्याची बाधा. मग ही बाधा काढण्यास पंचाक्षरी शोधला पाहिजे, तोंच हें भूत काढूं शकेल नाहीं तर "रोग रेड्याला व डाग पखालीला" अशांतली स्थिति व्हावयाची.

कापुरावर एकच अग्निकण पडला कीं पुरे. सर्व भस्मसात् होतें, तसेंच भगवंताच्या पवित्र नामाचा भक्तिभावानें उच्चार केला कीं सर्व पापांचा डोंगर विरघळून जातो. पापीपणाची जाणीव होणें हीच भक्तीची पहिली पायरी व ईश्वरा-विषयीं मातृभाव, पितृभाव उत्पन्न होणें ही वरची पायरी आहे.

सच्चिदानंदरूप परमात्म्याचा विचार मनांत आल्याबरोबर जी स्तब्धता (मुकेपणा) गहिवरपणा, सद्गदीत स्थिति या अवस्थांना भाव म्हणतात. जसें, पुष्कळ वर्षांनीं आपण मातोश्रीस भेटल्यावर परस्पर दोघांची जी स्थिति होते तीच.

प्रेमाच्या दोरीनें भक्त देवाला बांधून ठेवतो, गोपींनीं आपल्या प्रेमरज्जूंनीं श्रीकृष्णाला आपलासा करून घेतला. यशोदामाता ज्या वेळेस श्रीकृष्णाला उखळीला बांधण्याकरतां त्याला पकडूं लागली त्या वेळेस श्रीकृष्ण दूर दूर धावूं लागले. परंतु ज्या वेळेस यशोदेनें मातृवात्सल्यानें कृष्णाला हांक मारली ' अरे कृष्णा, कुलभूषणा कां रे मला त्रास देतोस ! ' त्यावेळीं श्रीकृष्ण स्वतः बंधनांत पडले, उखळीला बांधून घेतलें. म्हणजे भक्त भगवंताला दास करून ठेवतो.

तसेंच प्रिय बंधु-भगिनींनों आपण प्रेमानें या साईलीलेला बांधून टाका हीच या संपादकाची आपणांस विनंति.

संपादक.

---

# श्री साईलीला

## - अनुभव -

श्री. संपादक, " श्रीसाईलीला " त्रैमासिक यांसः—

स. न. वि. वि. खालील मजकुरास आपल्या लोकप्रिय त्रैमासिकांत स्थान द्याल अशी आशा आहे.

आमच्या साईबाबांच्या लीला अगाध आहेत. अनेकांचे अनेक अनुभव. किती म्हणून ते वर्णन करून सांगावयाचे. परंतु जेव्हां अकल्पितपणें स्वतःला तसा अनुभव येतो तेव्हां किती आनंद होतो. आपल्याला आलेली ती प्रचिति दुसऱ्या कुणाला तरी सांगावीशी वाटते. त्यांतच एक प्रकारचें समाधान वाटतें. ज्यांची श्रध्दा असते त्यांची श्रद्धा वाढते, ज्यांची नसते त्यांची बसते.

१९४८ सालांतली म्हणजे अगदीं ताजीच गोष्ट आहे. माझा मुलगा चि. साईनाथ एक महिन्याचा होता तेव्हांपासून सदानुकदा आपला आजारी असावयाचा. त्याला दुखणें आलें कीं आमच्या तोंडचें पाणी पळालेंच. मग मोठ्यामोठ्या डॉक्टरांचे उपचार सुरू व्हावयाचे. कुणी म्हणायचा अमुक रोग आहे, तर कुणी म्हणायचा तमुक रोग आहे. आम्हीं मात्र एकएका रोगाचीं नांवें ऐकून घाबरून जात असूं.

एकदां चि. साईनाथ फारच आजारी पडला. काय होतें तें आम्हालाच काय पण डॉक्टरांना देखील समजेना. आमचा तेव्हां डॉक्टरांवरही विश्वास आणि बाबांवरही विश्वास; डॉक्टरी उपचार तर सुरू केलेच. शिवाय प्रथमोपचार करणारी आमची मातृस्त्र सासू सौ. सुभद्राबाई पांडुरंग म्हात्रे हिनें आम्हांस साईलीला वाचण्यास आणि उदीचा उपयोग करण्यास सांगितलें. आम्ही सारखे बाबांचें नामस्मरण व सेवा तनमन करूं लागलों. औषधांतून उदी व तीर्थ देण्याचा नित्यक्रम चालू ठेवला. शिवाय बाबांची

स्तवनमंजीरी स्तोत्रें व पोथी यांचें वाचन चालूच होतें. आमचा सगळा भरीभार काय तो बाबांवर !

तीन महिने झाले, चार महिने झाले परंतु चि. साईनाथाचा ताप कांहीं हटेना. आमचा जीव घाबरून गेला. मुंबईहून मोठ मोठे डॉक्टर यावयाचे. ते सांगावयाचे. अमुक करा नी तमुक करा. आम्ही आपले त्याप्रमाणें उपचार करीतच होतों. कोणी म्हणाले, टॉयफॉईड आहे; दोन आठवड्यांनीं उतरेल. बेचाळीस दिवसांनीं निघेल. चोवीस तास बर्फ ठेवा. इंजेक्शनें द्या परंतु व्यर्थ. उलट सात महिन्यांच्या मुलाच्या डोक्यावर सारखा बर्फ ठेवल्यानें त्याला वातविकार होऊन तो वेड्यासारखें डोकें हलवूं लागला. आतां मात्र आमचा धीर फारच खचला. कुणी म्हणाले डॉ. कोहिलोंना दाखवा. ते मुलाच्या रोगाचे तज्ञ आहेत. झालें, कोहिलोनांही दाखविलें. ते म्हणाले, अमुक अमूक इंजेक्शनें द्या. इंजेक्शनें दिलीं परंतु रामाशिवागोविंदा. मुलाला कांहीं आराम वाटेना. शेवटीं निदानें झालें कीं, त्याला मॅनिन्जायटीज् झाला आहे ! तेव्हां त्याला स्ट्रेप्टोपिसिन इंजेक्शन द्या. डॉक्टर म्हणाले, इंजेक्शनें घरीं नाहीं देतां येणार. मुलाला हॉस्पिटल-मध्यें नेलें पाहिजे.

मी साईबाबांना सद्गदून सांगितलें—काय वाटेल तें झालें तरी मी मुलाला तुमच्या पायांजवळून हलविणार नाहीं. आतां सर्व उपचार सोडून देऊन याला फक्त तुमचें तीर्थ व उदी यावरच ठेवतें.

शेवटीं अंधेरींतील डॉक्टर चतुर्भुज पटेल तीं इंजेक्शनें घरीं देण्यास तयार झाले. परंतु एक इंजेक्शन दिलें नाहीं तोंच मुलानें डोळे पांढरे केले. त्याला सारख्या उलट्या सुरू होऊन तो जो बेशुद्ध पडला तो चोवीस तास शुद्धीवरच आला नाहीं. आतां मात्र आमचा उपाय हरला. डॉक्टरांनीं देखील आशा सोडली. आम्हीं साईबाबांचा धांवा सुरू केला. आतां तुम्हींच मार्ग दाखवा, असें त्यांना कळवळून सांगितलें. माझे यजमान तर अगदीं वेडेपिसे होऊन गेले. ते बाबांना म्हणाले, "याचे हे हाल आमच्यानें आतां पहावत नाहींत."

आमच्या मावस सासूचे यजमान पांडुरंग म्हात्रे यांनीं सुद्धां बाबांचा धांवा केला व आम्हांला धीर दिला.

रात्रीं माझ्या यजमानांचा चुकून कुठें डोळा लागला असेल तोंच त्यांना बाबांचा दृष्टांत झाला. तुझी आई कांहीं वर्षांपूर्वी अमुक असुक वैद्याचें औषध घेत असे. त्याचें औषध सुरू कर. ते जागे झाले. दृष्टान्त सर्वांना सांगितला. जो तो म्हणूं लागला कीं, यापूर्वी देखील तुम्हांला बाबांचा दृष्टांत झाला असला पाहिजे. परंतु तुम्हीं त्याकडे दुर्लक्ष केलें असावें म्हणून या मुलाला गोष्टी आल्या. तरी आतां दृष्टान्ताप्रमाणें वागा. बाबांची तुमच्यावर कृपादृष्टी आहे.

आम्हीं त्या वैद्याला आणलें (स्वप्नांत माझ्या पतींनीं त्यांना ज्या सफेत पोषाखांत पाहिलें होतें, अगदीं त्याच पोषाखांत ते आले होते त्यांनीं मुलास पाहिलें

व म्हणाले– आठ दिवसांत मुलाला बरा करून देतों. आम्हीं तर अगोदरच आशा सोडली होती. वाटलें, जेथें नामांकित डॉक्टरांनीं हात टेकले, तेथें हा वैद्य काय बरा करणार ! आतां बाबांची कृपा असेल तरच बरा होईल. आणि श्रद्धेनें आम्हीं उपचार सुरू केले. आणि काय आश्चर्य ! मुलगा चौथ्या दिवशींच पूर्ण शुद्धीवर आला व पुढें दीड दोन महिन्यांतच साफ बरा झाला व अंगाखांद्यावर पूर्वींच्याच उत्साहानें खेळूं बागडूं लागला. बाबांची लीला !

संपादक महाराज माझा हा अनुभव आपल्या साईलीलेच्या येत्या अंकांत अवश्य छापा. आमचे बाबा कुणाच्या कुणाच्या तरी निमित्तानें व रुपानें आम्हां पामरांच्या हांकेला कसे धांवून येतात व संकटमुक्त करतात तें इतरांना समजेल.

साईभक्तांची दासी
**सौ. पिरोज आनंदराव चोगले**
अंधेरी, मुंबई.

( २ )

पी. के. **चौधरी.**
वकील, यावल.
पूर्वखानदेश.

स. न. वि. वि.

मी साईबाबांचा अलिकडचा भक्त आहें व हल्लीं साईचरित्र वाचत आहे. त्यांत लिहिलेल्या बाबांच्या लीलेबद्दल मला आश्चर्य वाटतें व आदर वाटतो. त्यांत लिहिलेल्या लीलांप्रमाणें बाबा हल्लीं लीला खेळूं शकतात व भक्तांकरितां अवश्य वेळेवर मदत करतात असें मला एका भक्तानें सांगितलें ( प्रवासांत भेटलला मद्रासकडील भक्त ) व मला त्या गोष्टीचा अनुभव आला असून मी माझा आपणांस अलिकडचा अनुभव कळवीत आहें. आपणास योग्य वाटल्यास आपण साईलीला मासिकांत प्रसिद्ध करावा.

साईबाबांची भक्ती मी फक्त नामस्मरणानें त्यांची उदी वापरून करीत असतों. मी बरेच वेळां प्रवासांत असतों व प्रत्येक वेळेस उदी माझे खिशांत असते. ता. १२-१-५० रोजीं दुपारीं ४। वाजतां मी सुरत स्टेशनवरून अमळनेर गाडीनें भुसावळ्यास येण्यास निघालों. वाटेंत अजमासें ८ वाजतां माझा डावा कान अतिशय दुखायला लागला. तसा कान दुखायला लागला म्हणजे सर्व रात्र बेचैन स्थितींत जाते व फार त्रास होतो. त्याचे जोडीला प्रवासांतील फराळाचे तेलकट पदार्थ खाऊन माझें डोकेंही दुखायला लागलें. अशा रीतीनें १० वाजेपर्यंत नंदुरबार स्टेशन आलें तों पावेतों फारच त्रास झाला व तो बंद होईल असें बिलकूल वाटेना. नंदुरबार स्टेशनवर मी भक्तिभावानें बाबांचें नामस्मरण करून थोडी उदी सेवन केली. त्यानंतर पुन्हां १५-२० मिनिटें

त्रास झाला व मला झोप लागली. सकाळीं ६ वाजतां उठलों तर मला अगदीं ताजे-तवानें वाटायला लागलें. या परिस्थितींत माझी मनःस्थिती देखील इतर कारणांमुळें अस्वस्थ झाली होती व रात्र अतिशय त्रासांत जाईल असें मला खात्रीनें वाटत होतें. या गाडीला रात्रीं चोऱ्या होतात परंतु मजजवळ मोकळें असें पुष्कळ सामान असून देखील तें सुरक्षित राहिलें. हा सर्व चमत्कार म्हणजे बाबांची लीलाच आहे. अत्यंत आदरपूर्वक व भक्तिपूर्वक बाबांस नमस्कार करून मी हा लेख संपवितों.

आपला,

पा. के. **चौधरी**, वकील.

यावल.

## ( २ )

माझे परमप्रिय वाचक बंधू ( श्रीसाईलीला त्रैमासिक ) यांसी श्रीसाईबाबां-विषयींचे माझे कांहीं अनुभव मी आपणांस सादर करीत आहें व ते मी सादर करणें माझें कर्तव्य समजतों. नाहींपेक्षां माझेवर कृतघ्नपणाचा दोष येईल. तरी संपादक यांनीं येत्या अंकीं सदर दोन शब्दास जागा द्यावी अशी त्यांस माझी नम्र विनंति आहे.

मला प्रथम श्रीबाबांची ओळख मी ठाण्यांत रहात असते वेळीं माझ्या एका मित्राच्या ओळखीमुळें झाली. ती अशी तो दिवस गुरुवारचा होता. मी व पत्नी या दोघांस आठदहा दिवसांपासून ताप येत होता. इतक्यांत त्या दिवशीं तो गृहस्थ मला म्हणाला, रात्रीं आपण दोघेजण बाबांचे आरतीला जाऊं. त्या रात्रीं आम्हीं दोघेजण त्या गृहस्थाचे घरीं जाऊन उदीप्रसाद घेऊन बाबांस मनापासून प्रार्थना करून पुन्हा घरीं आलों. दुसरे तिसरे दिवसापासून आमच्या उभयतांच्या तापाचा बेडा पार झाला. त्यावेळेपासून मी ठाण्यांत असेपर्यंत बहुतेक गुरुवारीं बाबांच्या आरतीला जात असे. दुसरी गोष्ट म्हणजे आमचें घराणें पूर्वीपासून दत्तोपासक असल्यामुळें व त्यांचा व बाबांचा मुख्य वार गुरुवारच असल्यामुळें माझी भक्ति त्यांचे ठिकाणीं जडणें सहाजिक झालें.

या गोष्टीनंतर थोड्या दिवसांनीं श्री. मामा फडके हे शिरडीहून ठाण्यांत येऊन त्यांचा मुक्काम त्या साईभक्ताकडे होता. त्याच दिवशीं मी सहकुटुंब त्या साईभक्ताकडे गेलों होतों. त्यामुळें योगायोगानें आमची व श्री. फडके यांची ओळख तेथेंच प्रथम झाली व बाबांचा फोटो मला प्रथम त्यांनींच दिला. अजूनहि मी त्याच फोटोची पूजा करीत असतों.

एके दिवशीं सकाळीं ७॥-८ ची गोष्ट. मी सध्यां राहात असलेल्या कापूरबावडी येथील म्युनिसिपल वार्डांतून आमची चि. सुमन नांवाची दोन वर्षांचा मुलगी, आमची सर्वांची नजर चुकवून कंपाउंडच्या समोरील फाटकांतून सरळ रस्त्यानें नाक्यापर्यंत २००-३०० फूट अंतर चालून गेली. इतक्यांत माझ्या परिचयाच्या तेथील एका

माणसानें तिला उचलून आपले घरीं नेली. ( चि. सुमनच्या गळयांत नेहमीं बाबांच्या फोटोचें लॉकेट असतें. )इकडे आम्हीं कंपाउंडमध्यें तिचा शोध केला व माझे मनांत एक कल्पना येऊन मी चट्‌दिशीं रस्त्यावर आलों तों माझे समोरून एक रेतीनें भरलेली लॉरी ठाण्याच्या बाजूला गेली. माझे अंगावर शहारे उभे राहिले व मी जोरानें मोटारीच्या मागाहून नाक्यावर जाण्यासाठीं निघालों. इतक्यांत त्या दुकानवाल्याचा मुलगा माझ्याशीं हसला. त्यावर मी त्याला ' सुमन इकडे आली काय ? ' म्हणून विचारल्यावर तो 'नाहीं' म्हणून हंसूं लागला व तो घरीं गेला. नंतर थोड्याच वेळांत मुलीला आणून माझेकडे देऊन म्हणाला, " भाऊ सुमनचें नशीब जोरदार आहे, कारण ती येथें येईपर्यंत रस्त्यावरून एकही मोटार किंवा सायकल गेली नाहीं म्हणून बरें नाहींतर मुलीची आशा नव्हती. " मी त्यास लगेच मुलीच्या गळयांतलें लॉकेट दाखविलें व बाबांच्या कृपेचें कौतुक करीत घरीं गेलों.

त्यानंतरची गोष्ट. माझा धाकटा भाऊ दिगंबर यास फक्त चार दिवसांचा ताप येऊन एकदम त्याचें डोकें फिरलें व तो वेड्यासारखें बडबडूं लागला. कुठच्याही अडचणीचे वेळीं मी बाबांचें मार्गदर्शन त्यांचे फोटोपुढें चिठ्या घालून घेत असतों. तरी याही वेळीं मी बाबांस विचारलें; तों त्यांनीं उद्यांचे उद्यां त्यास मेन्टल हॉस्पिटलमध्यें घेऊन जा. तो बरा होईल असें सांगितलें. त्याप्रमाणें मी आमच्या इन्स्पेक्टरची चिठ्ठी घेऊन सिव्हिल सर्जनच्यामार्फत त्यास मेन्टल हॉस्पिटलमध्यें दाखल करून घेतला. तो चार महिन्यांनीं जुलै १९४९ मध्यें चांगला होऊन माझेकडे आला. आतां तो एकदम चांगला असून माझेकडे आहे.

अशीच आणखी एक आमच्या ऑफीसच्या इसमाची गोष्ट. त्याचें नांव नारायण चाऊ. हा गेल्या सप्टेंबरमध्यें कापूरबावडीच्या कंपाउंडमध्यें गवत कापीत असतां त्याचें बोट कापून पुष्कळ रक्त गेलें. तो ओरडत माझे खोलीजवळ आला व कपडा मागूं लागला. मी बाहेर येऊन पाहातों तों हा एकदम घायाळ झालेल्या स्थितींत मला दिसला. मी त्यास तेथें बसवून बाबांची उदी त्याच्या कापलेल्या बोटावर ठेवून कपड्यानें आवळून घट्ट बांधून, त्यास घरीं जाण्यास सांगून, उद्यां बाबांस एक फुलांचा हार घेऊन ये म्हणून सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं तो रोजच्याप्रमाणें कामावर हजर झाला. मात्र बाबांच्या हाराची आठवण त्यास राहिली नाहीं. आठदहा दिवस गेले तरी त्याला त्याची आठवण नाहीं हें बाबांनीं मनांत आणून एक दिवस असा आला कीं, थोड्याशा कारणानें इन्स्पेक्टरनीं त्यास अकस्मात कामावरून बंद केला. संध्याकाळीं घरीं जातेवेळीं तो मला म्हणाला, ' आपणांस उद्यांपासून कामावर येऊं नकोस' असें साहेबांनीं सांगितलें आहे. मला थोड्याच वेळांत त्याच्या बोटाची आठवण होऊन तूं अजूनपर्यंत बाबांचा हार दिला नसल्यामुळें आज तुला नोकरीला मुकण्याचा वाईट प्रसंग आला, तर तूं बाबांची क्षमा मागून पुन्हा तीनचार दिवसांनीं साहेबांना कामाविषयीं विचार. त्यानें

त्याप्रमाणें केलें व त्यास पुन्हा कामावर ठेवून तो आतां आमचे ऑफीसमध्यें अजून-पर्यंत काम करीत आहे. असो.

बाबांच्या दासांचा दास.
विष्णु सदाशिव सामंत
कापूरबावडी, ठाणें.

( ४ )

शिरडीची पहिली सफर.

संपादक **श्रीसाईलीला** यांस.

सप्रेम नमस्कार वि. वि.

मी आपणास मागील अंकीं श्रीसाईबाबांची ओळख कशी झाली तें सविस्तर दिलें आहे. यानंतर माझ्या शिरडीच्या सफरीचें वर्णन देत आहे.

मी साईबाबांची सेवा करूं लागल्यापासून माझ्या मनांत श्रीसाईबाबांच्या दर्शनाची फारच इच्छा झाली म्हणून माझे मित्र श्री. अनंतराव कर्णिक यांचेबरोबर कुटुंबासह निघालों.

|| निश्चयाचें ऐसें बळ | तुका म्हणे तेची फळ ||

आम्ही पेशावर मेलमध्यें बसलों परंतु गाडींत गर्दी फारच असल्यामुळें माझें कुटुंब गर्दीत चेंगरून गेलें व आम्ही स्टेशनवर उतरून दुसऱ्या मेलनें प्रवास करूं लागलों. इतक्यांत माझ्या मित्राच्या हाताला खिडकीचें तावदान लागलें त्यामुळें आमची फारच तारांबळ उडाली. कारण मी आजपर्यंत लांबचा प्रवास कधींच केला नव्हता. आम्ही सर्व भार, बाबांच्या दर्शनास निघाल्यामुळें बाबांवरच टाकला होता. मनोभावानें मी बाबांस नमस्कार करून माझ्या मित्राच्या हाताला प्रेमानें बाबांची उदी लावली. नंतर पांचच मिनिटानें त्याच्या हाताच्या वेदना थांबल्या व थोड्या वेळानें आम्ही स्टेशनवर उतरलों व पहांटेच्या मोटारनें शिरडीस गेलों.

आपला,
द. वि. भिसे.

( ५ )

**" श्री ज्ञानेश्वर माऊली."**

संतांची लीला अगाध आहे. मी. ह. भ. प. तुकाराम महाराज कबीर ( आळंदी-कर ) यांचेबरोबर कुर्ला मुक्कामीं ह. भ. प. आण्णासाहेब गव्हाणकर यांचे घरीं श्रीगणेश जयंतीला तारीख २२–१–५० रोजीं गेलों होतों. ह. भ. प. तुकाराम महाराज ४ वाजतां कीर्तनास उभे राहिले. मी हातांत टाळ घेऊन पाठीमागें उभा राहिलों. मला मोडाची व्यथा आहे व त्याच दिवशीं तिनें त्रास देण्यास सुरवात केली. जवळ जवळ ६ वाजे-

पर्यंत मीं कसाबसा उभा राहिलों. नंतर गुदद्वार फारच दुखूं लागल्यामुळें मी महाराजांची परवानगी घेऊन खालीं बसून टाळ वाजवूं लागलों. कीर्तन आठ वाजतां आटोपलें. दुखापत फारच वाढली व वेदना सहन होईनांत म्हणून डॉक्टरसाहेबांना ' कांहींतरी औषध द्या अगर मलम द्या. मला आतां वेदना सहन होत नाहींत " असें सांगितलें. त्यांनीं माझ्यासमोर श्रीसद्‌गुरुसाईबाबांची उदी आणली व पाण्यांत घातली व म्हणाले " आपल्या सद्‌गुरूचें नांव घ्या आणि प्या " त्याप्रमाणें मी केलें. जवळजवळ १ तासानें मला बरें वाटलें व मी सकाळीं ५ वाजेपर्यंत गाढ झोपलों. सकाळीं उठून पाहतों तो माझ्या धोतरावर रक्ताचे डाग पडलेले. मूळव्याध फुट्न त्यांतून पूं व रक्त बाहेर निघून गेलें व ती जागा साफ स्वच्छ झाली, व मला बरें वाटलें. आम्हीं तारीख २३-१-५० रोजीं ५ वाजतां कुर्ला सोडलें. श्रीसाईबाबा नव्हे—माउलीला माझी किती काळजी. संतांचा सहवास सदा घडो व डॉ. अण्णासाहेबांचा सहवास लाभो हीच त्या ज्ञानेश्वराकडे मागणी.

**हरिभाऊ आळंदीकर**
देवांची आळंदी, पुणें.
ता. २६-१-१९५०

(६)

संपादक महाशय, **श्रीसाईलीला त्रैमासिक** यांसः—
सप्रेम नमस्कार वि. वि.

खालील अनुभवास आपल्या मासिकांत जागा मिळावी.

श्रीसद्‌गुरुसाईबाबांस मी प्रत्यक्ष पाहिलेलें नाहीं पण त्यांच्याविषयीं माहिती कुर्ल्यास झाली. त्या दिवसापासून आम्हीं त्यांची सेवा करूं लागलों. मला सर्व मुली आहेत पण मुलगा नाहीं. पहिली बायको निवर्तल्यावर दुसरी केली तिलासुद्धां मुलगीच झाली व दोन वेळां नासवली. मला वाटलें माझ्या नशिबांत मुलगाच नाहीं तर कुठून होणार ? परंतु निष्ठा ठेवून श्रीसाईबाबांची सेवा करूं लागलों. आज तीन वर्षांनीं मला पुत्र झाला व तो श्रीसाईचाच प्रसाद आहे असें मी कां मानूं नये ? श्रीसाई खरोखर परब्रह्म, निदान आम्हां गरिबांना तरी आहेत असें वाटतें. त्यांची सेवा नित्य नियमानें निष्ठा ठेवून व सबुरी राखून केली तर आज ना उद्यां फळ मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. कळावें.

आपला
**परुळेकर**

(७)

I was in search of a proper and suitable place for my youngest daughter Vimala, and was not so much anxious as other parents

are, when grown up daughters remain unmarried. Because I had full faith in **Baba** that he would certainly find a place for her and suited to my purse. I heard of a boy, who was promising and very enterprising and serving in G. I. P. Bombay. Being old myself, I naturally asked my son-in-law Mr. Katti who is serving at Kirkee arsenal, to see the boy and approve if found suitable, by going over to Bombay personally. I settled the marriage of the girl by mere approval of my son-in-law; which fact was not all appreciated by my sister-in-law, Tulsabai, who protested and complained that I ought to have gone personally and see things with my own eyes, and then settled. She was quite unhappy and restless on this point Because she has care all my children as her own, since my wife's death in 1935, She rapted with this thought in a day time before Baba's photo. A voice of course, a male one, spoke to her why are you anxious about this girl: she is very fortunate and lucky, she will never feel wanting anything in her life. Her husband is ready to satisfy all the requirements and demands. Be calm unanxious. The boy is appearing for higher accountancy in Delhi next November and easy chances of good prosperity. Another proof of Sai's existence on our back.

There are so many other small types of experiences which could be numerated. When I returned from Bombay to Hubli on the 23 rd ultimo, I saw my youngest son Narayan was suffering from Ginia worm (नारू) which was pulled by one local doctor and torn in the middle. The boy had severe pain in the leg and big swelling. In His name whatever local remedies were told were done and within 15 days from its tearing the leg beeame as thin as it was before. The boy is now free from all pains, This disease they say of at least 3 months, But by His grace it was allayed within a fortnight.

I beg to remain
your most humblest
servant devotion
( Sd ) **S. B. Jamkhandi.**
Post Master, Hubli.
Dt. 4-6-49.

# कीर्तन

## श्री साई आख्यान

## भाग १ ला

### भजन

मंगल मूर्ती तूं मोरया ।
पावरे गणराया ।। धृ० ।।

### नमन

नमन आदी श्री गणपती । चतुर्दश विद्यांचा अधिपती ।। १ ।।
नमन माझें रे गुरुराया । कृपावंत श्री त्रिंबक सदया ।। २ ।।
नमन शिरडी देवा पायीं । विठ्ठल पुरुषोत्तम श्री सांई ।। ३ ।।
नमन पिता माता चुलता । साधू जनता श्री हनुमंता ।। ४ ।।
केशव करी तुम्हां तें नमन । व्या हो पदरीं त्या प्रेमानं ।। ५ ।।

### अभंग

जनीं वनीं ध्यानीं मनीं । राहो तुझें रूप ।
लागो भूक साई देवा । तुझी सदोदित ।। १ ।।
( भूक राम मारुताची । लागो सदोदित )
तृष्णा तुझी लागो आम्हां । गंगेचें उदक ।
लागो समाधान आतां । हारुनीयां दुःख ।।
किर्ती तुझी ठाऊक आम्हां । आहे तूं उदार ।।
घाली कृपेची ती भीक । नको जाऊं दूर ।।
पतीतपावन असशी । देई हेंचि सूख ।।
दास केशवाची आण । पाहूं देतें मूख ।।

( नंदलाला नाचरे ऽऽ )

धांवरे । धांवरे ।। धांवरे रघुराया । रामा ।। धृ० ।।
अज्ञ बालक मी उभा कीर्तनीं ।
बोल बोलरे माझ्या कानीं ।
उमटो द्वारी अंतरंगांनीं ।
बोलिवरे ' हरीमाया ' । रामा ।। १ ।।
धांवरे अंत नको पाहूं माऊली ।
वाट पाहते ग तान्हुली ।
बुद्धि सिद्धि सह साऊली
केशव हृदयीं राया । याया । धांवरे, रघुराया । रामा ।

### भजन

साईनाथ गुरु माझे आई। मजला ठाव द्यावा पायीं ॥

### आर्या

जिल्हा नामें नगरी कोपरगांवीं शैलधी नगरी
साई सहवास सुखें बनली शिरडी ही पंढरी नगरी

अहमदनगर जिल्ह्यांत कोपरगांव तालुक्यांत हें शिरडी गांव आहे, आणि त्या शिरडी गांवाला, जें खेडेगांव होतें त्याचें शिरडी क्षेत्र संतशिरोमणी सांईबाबा यांच्या निरंतर सहवासानें झालें. नुसतें क्षेत्रच नव्हे तर जसें पंढरपुराला संत पुंडलिक यानें श्री पांडुरंगाला आणून विटेवर उभा केला व त्या पंढरीला विठोबामुळें क्षेत्राचें माहात्म्य आलें तीच पंढरपूर नगरी जणू शिरडी पंढरपूरच झाली. त्या शिरडीचें वर्णन

### कटाव

अहमदनगर जिल्हा प्रांत। कोपरगांव आहे त्यांत ॥
क्षेत्र शिरडी वसवी संत। गोदेचें तें पात्र भोवतीं ॥
पाट पाडुनी पाणी आणती। पाण्यानें त्या मळे शिंपती ॥
गहूं हरभरा पीक अचाट। इक्षुदंड गूळ अफाट ॥
ज्वारी बाजरी हिरवीगार। मका जोंधळा कणसें फार ॥
चिकू पेरु मोसंबीचीं। फळाफुलांचे पानवेलीचीं ॥
झाडें झुडपें बागबगीचे। नंदनवन जणूं स्वर्गाचें तें ॥
आलें भूवरी रंजन करते ॥ १ ॥
लिंबू संत्रीं पिवळीं केळीं। खरबूज टरबूज जांभ रताळीं।
भुईमूग शेंगा भाजी भोपळे। जिकडे तिकडे दुधी कोहळे।
और शोभा आणली त्यांनीं। त्यांतची दिसती छान उठोनी।
पिवळी तांबडी शेवंती ती। नेवाळीचे घोस लोंबती।
जाई जुई ही त्यांतची घुसती ॥ २ ॥
गुलाब चंपा हिरवा चांफा। गुलछडीचा दिसतो ताफा।
मदन बाण मरवा दवणा। चोहोंबाजूला वास दणाणा।
नाना तऱ्हेच्या रंगरंगानें। घालती सर्वां मोहमोहीनी
कडुनिंबाच रानोरान। क्षय रोग्याला स्थानची छान।
रोगांची ती छाटी मान। सद्गुरू साई धरी अभिमान
अगाध शिरडीचें माहिमान। केशव सांगे या भेदून ॥ ३ ॥

पंढरपुरांत भीमा, तर शिरडींत गोदा, हिच्या प्रभावानें सर्व शिरडीगांव सुपीक झाला. उंस, केळीं, रताळीं, तसेंच फुलझाडें, मोसंबी, चिकूचे मळे वगैरे सर्व कांहीं त्या गोदेनें आपणांस दिले आहेत; इतकेंच नव्हे तर कडुनिंबाचीं झाडें जिकडे तिकडे

असल्यामुळें शिरडीची हवा शुद्ध स्वच्छ व असाध्य रोग्यांना, क्षयासारख्या रोग्यांना फारच उत्तम आहे. असें हें शहर जणूं इंद्राचें नंदनवन आहे.

## कटीबंध

ही दिसे क्षेत्र पंढरी । द्वारकापुरीं । गोदेच्या तिरीं
परी ती शिरडी ।
पावन करुनीयां दावी भक्ति कोरडी ।
येथील देव बोलती । सगुण ती मूर्ती । जयाला म्हणती
सांई श्रीनाथ ।।
जो पंचमुखीं परमेश पंढरीनाथ ।
( चाल ) जो असे संत संतांचा शिरोमणी ।
भाव धरा पूर्ण ` हृदयीं हें जाणूनी ।
आदरें साईच्या लागा तुम्हीं भजनीं ।
सांईवीण ते देव । मला नाहीं ठाव ! त्यावरी भाव ।
मुळीं न ठेवी ।
म्हणे केशव अमृत त्यजुनी वीष कां घेई ।

ही शिरडी नुसती अन्नपाणी आणि शुद्ध सात्विक हवा देत नाहीं तर ही द्वारका आहे. श्रीकृष्णाचें स्थान असल्यामुळें प्रत्येक मानव प्राण्याला आपल्या नरदेहाचें सार्थक कसें करून घ्यावें व कोणता मार्ग घ्यावा हें शिकवितें. त्या क्षेत्रांत देव चालताबोलता, सगुण साक्षात् अवतार आपणाकरतां धांवून आला आहे; त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून, मुखानें त्याचें भजन केलें तर, ज्ञानेश्वरानें सांगितल्याप्रमाणें देवाचें द्वार ताबडतोब दिसेल.

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी ।
तेणें मुक्ती चारी साधीयेल्या ।
हरी मुखें म्हणा, हरी मुखें म्हणा ।
पुण्याची गणना कोण करी ।

मग असें जर आहे तर पुढें अमृताचा–दुधाचा प्याला असतांना विष पिण्याची अवदसा आपणांस कां आठवावी ?

ही श्रीसाईची मूर्ति कुठून आली; कारण श्रीविठोबाला पुंडलिकानें उभा केला. मग शिरडी ही जर पंढरपूर आहे तर, श्रीसाईबाबांना शिरडींत कोणी उभा केला.

## आर्या

होता निजामशाहींत सच्छिल पाटील संत सत्भक्त ।
नामें चांद प्रसिद्ध धनवान संपूर्ण धूप खेड्यांत ।

औरंगाबाद शहरांत धूप नांवाचें खेडें आहे. त्या खेड्यांत चांद पाटील नांवाचा मुसलमान व्यापारी रहात असे. तो सात्विक भावनाप्रधान व अल्लाचा निस्सीम भक्त होता.

त्याच्याजवळ एक बहुमोलाची घोडी होती. सकाळीं पहांटेस उठावें, नमाज वगैरे मुसलमानी धर्माप्रमाणें सर्व आन्हिक उरकून, न्याहरी करून, घोडीवर खोगीर चढवून, औरंगाबाद शहरांत आपला व्यापारधंदा करण्याकरितां येत असे. शहराजवळ आल्यावर जवळ एकाद्या शेतांत घोडीला चरण्यास सोडून शहरांत व्यापारउदीम करण्याकरतां जावें व संध्याकाळीं जो कांहीं माल घेतला आणला असेल तो घोडीवर लादून घरीं परत जात असे.

एके दिवशीं नित्याप्रमाणें घोडीला चरण्यास सोडून पाटील शहरांत गेला व संध्याकाळीं नेहमींप्रमाणें परत आला तर त्याला शतांत अगर आसपास घोडी दिसेना. शेवटीं कष्टी होऊन हळहळूं लागला. जवळ जवळ दोन महिने आपला धंदारोजगार टाकून घोडीचा तपास करण्याकरतां जंगलांत फिरावें व आंबट तोंड करून घरीं यावें.

एके दिवशीं मनाचा निश्चय करून व अल्लावर सर्व भरवंसा ठेवून घोडीच्या तपासाकरितां निघाला.

## दिंडी

फिरुनी फिरुनी पाटील हो उदास ।
थकुनीं गेला घोडिची नुरे आस ।
निराशेनें पातला आम्रवृक्षीं ।
गांठ पडलि अवलिया त्यांस लक्षी ।

तो पाटील जंगलांत फिर फिर फिरला व शेवटीं घोडीचा कुठेंही पत्ता लागला नाहीं म्हणून उदास होऊन विश्रांतीकरतां एका आंब्याच्या झाडाखालीं आला. तों त्या ठिकाणीं एक अवलिया बसलेला त्याला आढळला.

## मन्दाक्रांता

"आंवो, आंवो" म्हणुनि अवलिया पाटिला हांक मारी ।
"पीवो, पीवो" चिलिम तरि जरा बैस तूं घे सबूरी ।
नाहीं, नाहीं वखत मजला घोडि माझी पळाली ।
शोधूं कोठें लवही नकळे काय आहे कपाळीं ॥

दोघांची नजरानजर झाल्याबरोबर अवलियाने "अहो पाटिलबुवा, इकडे या" अशी हांक मारली, आणि म्हणाला, "आपण फार थकलेले दिसतां. जरा खालीं बसा. विश्रांती घ्या; चिलीम वगैरे शिलगावा म्हणजे आणखी बरें वाटेल." पण पाटील आपल्या घोडीच्या चिंतेंत. काय करील बिचारा! तो एकदम म्हणाला, "आपणांस बोलणें सोपें वाटतें. माझी बहुमोलाची घोडी कीं जिनें मला आणि माझ्या बाळांना जीवन दिलें ती घोडी हरवली आहे व तिच्या शोधार्थ मी हा फिरत आहें. आज दोन महिने झाले तिचा पत्ता लागत नाहीं. आतां माझ्या कपाळीं काय आहे कोण जाणें. मला आपली विनंती मान्य करण्यास व जवळ येऊन चिलीम ओढण्यास मुळींच सवड नाहीं. मला घोडीचा पत्ता लावलाच पाहिजे."

### दोहरा

क्या बाते कर रहे झूटी।
खेतीमें यहां चरत है घोडी
आंखे खोलकर देखो भाई।
क्यों करत है इतनी डेरी।

इतकें बोलून पाटील जाणार इतक्यांत अवलिया म्हणाला, "पाटील बुवा! शांत रहा. आपण किती खोटें बोलतां. त्या शेतांत ती पहा आपली घोडी चरत आहे. अरे जरा डोळे उघड, झांकल्या डोळ्यांनीं चालूं नकोस! जरा शांत हो व डोळे पूर्ण उघडून पहा, तुला तुझी घोडा दिसल."

### दिंडी

बहुत झाला आनंद पाटलाला।
बघुनि घोडी तेथेंच त्या स्थळाला।
सिध्दवाचा जाणूनी झणीं बोले।
धन्य झालों मी नशिब तें उदेलें।

पाटलांनीं घोडी त्या शेतांत चरतांना पाहून आणि आनंद झाला. शेतांत गेला व त्यानें घोडीला चुचकारली. घोडीनें आपल्या मालकाला पाहिल्याबरोबर तिलासुद्धां आनंद झाला, व ती किंकाळूं लागली व मालकाबरोबर जाऊं लागली. पाटील घोडीला घेऊन त्या आंब्याच्या झाडाखालीं आला. आणि मनांत विचार करता झाला कीं, काय ह्याची सिद्ध वाणी! बोलतां क्षणींच अनुभव!! खरोखरीनेंच आज मी धन्य झालों. आजपासून माझें नशीब उदयाला येणार खास. भाग्याचा मी कीं आज हा अवलिया मला भेटला. दोन महिन्यांची माझी मेहनत आज फळाला आली.

### शार्दूलविक्रीडित

बोले बाल-फकीर पाटिल जरा तूं धूम्रपाना करी।
घेई घाल तमाखु पी प्रथम तूं देई सख्या मत्करीं।
पाहोनी सत्भाव पाटिल झणीं सन्नीध त्या पातला।
मोदें घेउनि ती चिलीम परी त्या वन्ही नसे भूतला॥

घोडी घेऊन पाटील आले तेव्हां त्यांस बाबा म्हणाले,"आतां तरी तूं बाबा चिलीम ओढशील कीं नाहीं? अरे जरा बैस, सबुरी घे, तुझी घोडी मिळाली, आतां घाई करूं नकोस. चित्त शांत कर. समाधान वृत्ती धर. हं घे ही चिलीम, हा तमाखू. कर लवकर तयारी. तूं अगोदर झुरका मार, कारण चिलीमीची तुला गरज आहे, तूं थकलला आहेस. तुला समाधान वाटलें कीं मला दे, म्हणजे मी ओढीन." पाटलाला आनंद झाला. अवलियाचा चांगुलपणा पाहून तो त्याच्याजवळ गेला व ती चिलीम हातीं घऊन त्यानें तयारी केली. आतां फक्त पेटविण्याची खोटी; पण छापी भिजविण्याकरतां पाणी व पेटविण्याकरतां विस्तव नाहीं म्हणून खिन्न झाला व टकमक टकमक इकडे तिकडे

बघूं लागला. चिलीम तशीच हातांत धरून तो अग्नीचा शोध करूं लागला. परंतु त्याला त्या जंगलांत अग्नी कुठून मिळणार ? तो स्तब्ध बसून विचार करीत राहिला कीं, आतां काय करूं, कसें करूं !

### दिंडी

फिकिर बघुनी स्तब्धता पाटलाची ।
पाणि काढी आपटोनि भू वरीची ।
छापि भिजवूनी, अनल प्रगट केला ।
हातिं चिमटा खुपसोनि त्या स्थळाला ।।

फकिरानें पाटलाकडे बघितलें व त्याची ती स्तब्धता पाहून म्हणाले, " काय पाटीलबुवा ! हं पेटवा ना, आतां उशीर कां ?" पाटील काय बोलणार. खिन्न वदनानें पाटील पाहूं लागला तों फकिरानें ती त्याची अवस्था पाहून, हातांतला सटका जमिनीवर आपटला. तों काय ! झुळझुळ पाण्याचा झरा वाहूं लागला व हातांत चिमटा घेऊन एकदम जमनींत खुपसून जळजळीत निखारा चिलिमीवर ठेवून ती चिलीम पाटलास पिण्यास दिली.

### शार्दूलविक्रीडित

लीला त्या बहु गोड पाहुनि मनीं पाटील झाला मृत ।
आनंदें हृदयांतुनी नटुनीयां सेवूं म्हणे अमृत ।।
साधू-संत शिरोमणी खचित या मूर्ती दिसे बावळी ।
दैवाच्या घटनात्मकें जरि गमे कैसा परी बावळी ।।

पाटीलबुवांच्या नजरेसमोर हा सगळा प्रकार घडला गेल्यामुळें पाटील मेल्यागत झाला. त्याचा सर्व ताठर अभिमान जिरून गेला व ह्या लीला पाहून मनांत आनंदून म्हणूं लागला कीं, हा जरी वरून बावळा दिसत आहे तरी ' वेड्यावाणीं दिसतोरे, ब्रह्मज्ञान सांगतोरे ' असा हा मोठा साधू केवळ साधूच नाहीं तर संतशिरोमणी आहे आणि आज हा मला दैवानें म्हणा अगर प्राक्तनकर्माप्रमाणें म्हणा दिसला आहे. ह्याला आपलासा करून ह्याच्याकडून ज्ञानामृत घेतलेंच पाहिजे. नाहीं तर माझा जन्म फुकट. देव देतो आणि कर्म नेतें; परंतु हा आतां मला कसा मिळणार ! काय उपाय केला असतां हा मला वळेल ?

### (चाल—राजहंस माझा निजला)

सामर्थ्य दावुनी नयनीं । भुलविला । चांद पाटील
हा कोण कोठुनी आला । नुमगला । फकिरी बोल.
प्रेमाचें भरतें आलें
सद्‌गतीत पाटिल झाले
रोमांचहि शरिरीं आले
तनु कंपित बोले बोल । भुलविला । चांद पाटील.

विनवणीं करी फाकिराला
तुम्हि यावें मम सदनाला
वर मागें इतुका वबडा
मी गुलाम बंदा अपुला । भुलविला । चांद पाटील.

अगाध लीलेमुळें व अचाट सामर्थ्ययोगानें पाटीलबुवा भुलून गेले व विचार करूं लागले कीं, हा कोण, ह्याचा पत्ता काय, हा फाकिरी वार्ता करीत आहे. दिसायला वरून बावळट दिसतो परंतु आंतून मोठा शहाणा आहे. ह्या विचारानें प्रेमाचा पान्हा फुटला व सद्‌गादित झाला. शरीरावर रोमांच उभे राहिले व आनंदाश्रू वाहूं लागले. शरीर कंपायमान होऊन तोंडांतून शब्द फुटेनासा झाला. हृदय भरून आलें. अशा त्या स्थितींत असतां त्यानें फाकिरास आपल्या घरीं येण्याविषयीं विनंती केली, " महाराज, आपण माझ्या घरीं यावें व या गरीबा घरच्या भाकरीचा आस्वाद घेऊन आपला वरप्रसाद मला व माझ्या मुलांस द्यावा. या क्षणापासून मी आपला बंदा गुलाम आहे. महाराज एवढीच माझी विनंति मान्य करा."

**मन्दाक्रांता**

जगत्‌जननि माउली परी कसा दिसे जोगडा ।
' हरी ' सतत अंतरीं धरितसे गुरू रोंकडा ।
करी मान्य प्रार्थना विनवणी तो निघे यावया ।
फकीर पद ठेवितां सदनिं होय भाग्योदया ॥

जी जगाची माऊली वरून दिसायला जरी जोगडा असली तरी आंतून गुरूचें नामस्मरण अखंड चालूच अशा त्या महान् साधूला काय गाडी घोडे पाहिजे होते होय ! देव भावाचा भुकेला आहे. फक्त प्रेम, प्रेमाची हांक, प्रेमाचे शब्द कानीं पडतांच ताबडतोब पायीं निघाले व धूपखेड्यांत चांद पाटलाच्या घरीं आले. सूर्य उगवल्यावर अंधःकार कोठून असणार, त्याचप्रमाणें ह्यांचा पाय घराला लागल्यावर भाग्योदयाला कितीसा उशीर !

एके दिवशीं असा प्रकार घडला कीं:—

**आर्या**

शिरडी ग्रामामध्यें जमली ती सोयरीक भाच्याची ।
पाटिल मामा साधी जोग्यासह ती सुवेळ लग्नाची ॥

चांद पाटलाच्या बायकोच्या भाच्याची सोयरीक शिरडीमध्यें जमली आणि लग्नसोहळा शिरडी मुक्कामींच ठरला. पाटील अवलीयास म्हणाले कीं, महाराज भाच्याचें लग्न जमलें आहे आणि आतां आपणा सर्वांना शिरडी मुक्कामीं मुलीच्या गांवीं जाणें आहे. आपणसुद्धां येणें करणें.

**इंद्रवज्रा**

पाटील जे बोल वदूनि गेला ।
होते मनीं तेंचि फकीर वाला ॥

वैराग्य–भक्ति हृदयीं धरोनी ।
चाले हळू मार्ग क्रमक्रमानी ॥

ह्या अवलियाच्या मनांत जें होतें तेंच पाटील बोलून गेला. जवळ जवळ दोन महिने ते चांद पाटलाचे धूपखेड्यांत होते. वैराग्य आणि भक्ति जवळ असून आपला ठावठिकाणा किंवा पत्ता त्या पाटलाला कळूं दिला नाहीं. उलट आपणास कांहीं माहित नाहीं (अशा बाण्यानेंच ते रहात असत. ज्ञानी लोकांना जर विचारलें, 'आपलें ज्ञान किती आहे ?') तर ते म्हणतील "सिंधूंत बिंदू अथवा मला अद्याप कांहींच कळलें नाहीं" एवढी तपस्या पाठीमागें असतांनासुद्धां ते त्या वऱ्हाडाबरोबर हळू हळू मार्ग चालूं लागले व शिरडी मुक्कामीं आले.

**दिंडी**

वऱ्हाडासह शिरडींत फकिर आला ।
खंडोबाच्या देउळीं प्रथम गेला ॥
"आंवो सांई" म्हाळसा हांक मारी ।
नाम "सांई" धरि तेंचि अम्हां तारी ॥

शिरडीच्या वेशींत आल्याबरोबर हें वऱ्हाड रस्त्याच्या बाजूलाच असलेल्या खंडोबाच्या देवळाच्या अंगणांत झाडाखालीं उतरलें. त्या खंडोबाचा महान भक्त म्हाळसापती भगत पूजा करून देवळाच्या दरवाजाबाहेर पडत होता इतक्यांत ही मूर्ति तेथें गेली. म्हाळसापतीनें पाहतांच "आंवो साई" अशी हांक मारली आणि तेंच नांव शेवटपर्यंत व अद्यापपावेतों अव्याहत चालूच आहे. या अवलियाचें पहिलें नांव काय हें माहित नाहीं परंतु त्यांना 'सांईबाबा' हें नांव म्हाळसापतीनें खंडोबाला साक्षी ठेवून दिलें.

**गीत**

कशीग तुझी झाली । कुणी ग बाई केली ।
शिरडे । तुझी नवी, नवी ग नवलाई ॥ धृ ॥
तरुण बांड खुला ।
सोळा ग पुरीं झाला ।
चैतन्याचा गोळा, साई ग सूर्य आला ॥ १ ॥
विशाल भाल पाहीं ।
शिरडींत सदा राही
उपमाच त्याला नाहीं, नाहीं ग बाई नाहीं ॥ २ ॥
वेडी ग बाई झालें ।
शरण त्याला गेलें ।
केशवा हृदयीं जाऊनी बाई ठेलें ॥ ३ ॥

अशा रीतीनें श्रीसद्गुरु साईनाथ शिरडी खेडेगांवांत आल्यावर शिरडी खेडेगांवांचें रूप शिरडी क्षेत्रांत झालें. त्या शिरडीचें अशा तऱ्हेनें रूप पालटल्यावर तिला

शेजारच्या खेडवळ बाया विचारतात, "अग शिरडे ! तुझ्यांत इतका फरक पडण्याला कारण तरी काय झालें, कीं जी तूं काल शेंबडी पोर होतीस, तुला कोणीसुद्धां गांवांत विचारीत नव्हतें; पण आतां शिरडी गांवकरीच नव्हे तर तुझें नांव जिकडे तिकडे जगांत लहानापासून थोरांपर्यंत, श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत, जातीजातीचा भेद न मानतां सर्वतोमुखीं झालें व तुझ्या नांवाचा नुसता उदो उदो करून राहिले नाहींत तर तुझें आनंदमय स्वरूप पाहण्याकरतां दिवसें दिवस लोकांचे थवेच्या थवे येत आहेत. असं कोणतं पुण्यकर्म, कोणतं व्रत तूं केलें होतेंस तें तरी आम्हांस सांग. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आम्हीं पूजाअर्चा, निरनिराळे भागवत ग्रंथ, पुष्कळ तऱ्हचीं व्रतें, पुष्कळ तीर्थे, नामाचा जपसुद्धां केला तरी पण अद्याप आमच्यांत यत्किंचितही फरक होऊं नये ! म्हणून तुझे आम्हीं पाय धरतों कीं ज्या मार्गानें तूं गेलीस आणि पावन झालीस तो मार्ग आम्हांस सांग." शिरडी सांगते:—

"बायांनो ! काय सांगूं मीं तुम्हाला. माझ्या प्राक्तनकर्माप्रमाण मला एका तरुण-बांडाब्री—ज्याला मिसरुडसुद्धां फुटली नाहीं अशा सोळा वर्षांच्या जणूं काय चैतन्यरूप सूर्याची भेट झाली. तो आल्या दिवसापासून त्याला सोडलें नाहीं आणि त्यानें मलाही सोडलें नाहीं. काय सांगूं, कोणती उपमा त्याला देऊं हेंच मला समजत नाहीं. त्याला पाहिल्याबरोबर माझी तहानभूक हरपली, देहभान विसरलें आणि मी त्याला तन—मन—धनानें सर्वस्वी शरण गेलें आणि नंतर त्यानें मला चैतन्य दृष्टी देऊन जळीं, स्थळीं, काष्ठी, पाषाणीं एक तोच उरला आहे हा अनुभव दिला म्हणून मी सर्व ठिकाणीं त्यालाच पहातें. तोच माझा पूर्ण आधार असल्यामुळें जसें शंकरापुढें नंदीला मान मिळतो तसेंच त्या चैतन्यघन सर्वव्यापि श्रीकृष्ण स्वरुपी श्रीसांईच्या मुळेंच माझी आज किंमत वाढली आहे तरी तुम्ही सर्वांनीं त्यालाच शरण जा मग तुमची सर्वांची तीच अवस्था होईल. आज मला पंढरपूर क्षेत्राच्या ठिकाणीं बसविण्याचा अधिकार त्यालाच आहे."

**भजन**

हे माधवा मधुसूदना । जय जय गोपी मनरंजना ।।
जय कुंजविहारी मनमोहना । साईरमणा नित्यनंदना ।। जय० ।।

अशा रीतीनें शिरडी गांवचे शिरडी क्षेत्र ( पंढरीनगरी ) बाबांच्यामुळेंच झालें.

**आर्या**

जिल्हा नामें नगरी कोपरगांवीं शैलधी नगरी ।
साई सहवाससुखें बनली शिरडी ही पंढरी नगरी ।।

**भजन**

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।
गुण गाईन आवडी । हेंचि माझी सर्व जोडी ।।

त्र्यंबकदास केशवकृत

—हरि ॐ तत्सत्—

# —: श्री साई भजन माला :—

## " प्रासादिक अभंग "

( १ )

भोळा शिवशंकर । आदी साईनाथ ।
स्वयंभू प्रसिद्ध । ते अंबरनाथ ॥ १ ॥
साई शिव सत्य । विठ्ठल रखुमाई ।
ॐकार स्वरुप । घाला मिठीं पायीं ॥ २ ॥
शिवाचें प्रतीक । नरनारायण ।
शिरडी साईबाबा । आहे नित्य जाण ॥ ३ ॥
शिरडी पंढरपूर । काशी बद्री गया ।
क्षेत्रें महा प्रसिद्ध । लागों आमुच्या पाया ॥ ४ ॥
भक्तिभाव ठेवा । खा मधुर मेवा ।
प्रेम तुमचें आतां । द्या हो त्या केशवा ॥ ५ ॥

( २ )

भेटीं आलों तुझ्या देवां ।
द्यावा आशिर्वाद मेवा ॥ १ ॥
असूं द्यावें पूर्ण प्रेम ।
परंपरा हाचि नेम ॥ २ ॥
*भाऊ गेले निजधामा ।
आत्मा दिला शांतारामा+ ॥ ३ ॥
भिवंडी कुर्ला नाहीं दोन ।
साई विठ्ठलाचें स्थान ॥ ४ ॥
शांतारामीचा तो ध्यास ।
नित्य लागो केशवास ॥ ५ ॥

---

* गुरुवर्य गणेशभक्त त्रिंबक विठ्ठल सामंत, कुर्ला. + श्री. शांताराम भाऊ जयवंत भिवंडी.

( ३ )

कां रे मातलासी । सोडूं नको देवा ।
जीवाचा सांगाती । साईरंग ॥ १ ॥

जिव शिव एक । कारे भुललासी ।
व्यर्थ घालवसी । क्षण क्षण ( वेळक्षण ) ॥ २ ॥
" ओ " म्हणे त्वरीत । हांकार करितां ।
ॐकार स्वरुप । शुद्ध जाण ॥ ३ ॥
लकडी पेट घेई । अग्नी आहे म्हूण ।
दगड तो राही । जैसा तैसा ॥ ४ ॥
काळ उभा द्वारीं । येई कोण संगे ।
विचार तूं करी । आपुल्या चित्तीं ॥ ५ ॥
अभिमान सोडी । जाई साई शरण ।
घेई आत्माराम । निजहृदयीं ॥ ६ ॥
मग त्या आनंदा । नाहीं पारावार ।
केशवानुभव । पहा जीवा ॥ ७ ॥

( ४ )

हृदयींचा देव नाहीं केला जागा । सर्व खटाटोप जाईल वाऊगा ॥ १ ॥
साधन ते जीवा नाममंत्र जपा । कलियुगीं हाच मार्ग असे सोपा ॥ २ ॥
भावावीण नाम जाईल फुकट । भक्ति भाव प्रेम देईल अतुट ॥ ४ ॥
एक मुखीं राम करा नित्य काम । आणिक दुसरा नको आम्हां नेम ॥ ४ ॥
राम साईराम रामकृष्ण हरी । केशवा हृदयीं साई शिरडी बरी ॥ ५ ॥

( ५ )

कारे जीवा करिसी, उगीच कांगावा ।
फुका घालविसी, आपुला तो ठेवा ॥ १ ॥
व्यर्थ कां दवडी; मोलाचा तो क्षण ।
काळ उभा जवळी, करील भक्षण ॥ २ ॥
कोणाच्या सांगाती, आला तूं जन्मासी ।
कृतघ्न कसारे विसरुनी त्यासी ॥ ३ ॥
आग लागो तुझ्या तठारपणासी ।
घात करीं तोची सर्वस्वीं जीवासी ॥ ४ ॥
जाई जाई शरण जो आहे सांगाती ।
विश्वासुनी राही त्याचे वरती ॥ ५ ॥

जळीं स्थळी तोची भरला असे पूर्ण ।
हृदय कमळ अर्पी त्या संपूर्ण ॥ ६ ॥
नको जाऊं कोठें जीवाच्या केशवा ।
धरीं एक चित्तीं साई रमाधवा ॥ ७ ॥

( ६ )

दुरुनियां आलो, भिमेच्या रे तटीं । पहाण्यासी तुज, कसा उभा विटीं ॥ १ ॥
दृष्टी सुखावली तृप्त झालों मनीं । राहूं दे हें रुप सदा माझ्या ध्यानीं ॥ २ ॥
पतीत पावना अनाथाच्या नाथा । तारी तूं केशवा विठू साई नाथा ॥ ३ ॥

( ७ )

पुरे झाला खेळ आणि जिवाचा खंडोबा ।
अंत नको पाहूं सदया भेटीं साईबाबा ॥ १ ॥
कासयानें पूजा करूं मज नाहीं सत्ता ।
सर्वां ठायीं भरलासी तूंची रे अनंता ॥ २ ॥
श्वान दारीचा मी तुझा टांक एक तुकडा ।
आशेनें रे दारीं उभा दावी तव मुखडा ॥ ३ ॥
तोंड पूजा करूं नको दावी अनुभव ।
धीर नाहीं धरवत माधवा तूं धांव ॥ ४ ॥
धन सुत दारा गेह अर्पिलें मी तूज ।
रुजू झालों सर्वस्वी तुझ्या चरणीं आज ॥ ५ ॥
आतूर असे केशव सगुण साव दर्शना ।
उशीर कारे लावीसी साई तूं सुदर्शना ॥ ६ ॥

( ८ )

नर देह झाला प्राप्त । भाग्यवान जीवा ।
करणीं करुनी गांठीं । नारायण ठेवा ॥ १ ॥
प्रेम देई प्रेम देई । फक्त श्री केशवा (श्रीकृष्ण)
द्वैत भाव विसरोनी । नाम एक सेवा ॥ २ ॥
श्रवण लोचन घ्राण । त्वचा ती रसना ।
दैन्याचीं द्वारें असतीं । आधिं ओळंगना ॥ ३ ॥
नाहीं पुरे यांचें यांसीं । काय तुज देती ।
नकोरे अहारीं जाऊं । पाठीं ती लागती ॥ ४ ॥

हरी हरी म्हणा मुखीं । करा त्या सोयरा ।
त्र्यंबकदास केशव । करी रे जोहरा ॥ ५ ॥

( ९ )

अंतरीं पालट होय । एका हरी नामें ।
देवा ऐसा देव होती । पाठ करा नेमें ॥ १ ॥
ठसा उमटावा मनीं । एका नाम जपें ।
नव्हे ल्टिकें तें नाम । किती आहे सोपें ॥ २ ॥
विठ्ठल साई सहज । तशी मुख वाणी ।
लाभसुख सहज तें । मिळे चक्रपाणी ॥ ३ ॥
स्वानुभवांचा प्रताप । सांगा दोही काना ।
त्र्यंबकदास केशवा । मग विठो कां ना ! ॥ ४ ॥

( १० )

देहाच्या डोंगरीं पैं उंदीर ते सहा ।
पोखरुनी करिती विष गुंफा महा ॥ १ ॥
नामाचा पिंजरा ठेवा महाद्वारीं ।
कोठें आहे वाव शिरण्या भितरीं ॥ २ ॥
हरी धन एक करा रे जतन ।
नाम संकीर्तन पैं एकची साधन ॥ ३ ॥
प्रेमभाव उपजो नामाच्या त्या नामीं ।
त्र्यंबकदास केशवा काय आहे कमी ॥ ४ ॥

( ११ )

कल्पना संकल्प वृत्ती हरी रुपें ।
संत समागमी कळती स्वरूपें ॥ १ ॥
वृत्तीचा चालक कोण आहे जगीं ।
विचारी जीवा तूं हरी एक जागीं ॥ २ ॥
नाहीं झाला बोध, हरीच्या पदाचा ।
जप तप योग वांया गेला साचा ॥ ३ ॥
एका त्या नामाचा पिटा हो डांगोरा ।
काळ उभा पुढें करितो पोबारा ॥ ४ ॥

नामाच्या छायेंत रहारे निवांत ।
त्र्यंबकदास केशव सांगे तुम्हां प्रत ॥ ५ ॥

( १२ )

ध्यानीं दिनीं आणा नित्य भिमातटवासी ।
समचरण विटेवरी उभा पंढरीसी ॥ १ ॥
मकर कुंडले कानीं शोभती जयासी ।
पीत धारी करकटी माळ गळां तुळसी ॥ २ ॥
साजीरे गोजीरे रूप देखे डोळे भरी ।
भूवैकुंठी जगजेठी उभा शिरडी ती पंढरी ॥ ३ ॥
कोण्या रिते वर्णू तुज साई घननीळा ।
त्र्यंबकदास केशवा दे भक्तिचा सोहळा ॥ ४ ॥

---

# —: शिर्डीवृत्त :—

## माहे डिसेंबर १९४९

या महिन्यांत बाहेरगांवचे बरेच भक्त श्रींचे दर्शनास आले होते. या महिन्यांत नाताळची रजा असल्यानें त्या आठ दिवसांत शिरडीस भक्तांची गर्दी झाली होती.

**देणगीः**—या महिन्यांत २९ भक्तांकडून निरनिराळ्या प्रकारच्या देणग्य ( वस्तूमध्यें ) आल्या आहेत.

धर्मकृत्यः—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, नैवेद्य, ब्राह्मणसुवासिनी, अन्नदान वगैरे धर्मकृत्यें नेहमींप्रमाणें झालीं. एका भक्तानें या महिन्यांत श्रीसत्यनारायणाची पूजा घातली.

**कीर्तनः**—या महिन्यांत मार्गशीर्ष शुद्ध ११ व वद्य १२ आणि श्रीदत्तजयंति-निमित्त संस्थान गवई यांचीं तीन कीर्तनें श्रीमंदिरांत झालीं.

**नवलविशेषः**—नाताळच्या सुट्टींत शिर्डीसंस्थानची अधिकारी मंडळी श्रींचें दर्शनास आली होती.

श्री. रामभाऊ कडलासकर, पंढरपूर; श्री. माणिकराम राणे, खार; श्री. पिरोजबाई दस्तूर यांनीं श्रीपुढें गायनाची हजेरी दिली.

श्री. डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर, मुंबई यांचे श्रीसाई चरित्रावर श्रीपुढें कीर्तन झालें.

शंकरराव मंगळवेढेकर, पंढरपूर यांनीं तबला तरंग वाजवून श्रीपुढें हजेरी दिली. श्री.भानुदास तरडे, बऱ्हाणपूर यांचें बांसरी-वादन झालें. श्री. गोविंदप्पा यांनीं

तेलगू भजन केलें. कु. कृष्णाबाई वामनराव धुरंधर, दादर-मुंबई यांनीं श्रीपुढें संगीत भजनाची हजेरी दिली. श्री. अंबादास जामखडे व उमाप्रसाद साकोरीकर बुवा यांचीं भजनें श्रींपुढें झालीं.

शिरडी येथील हवापाणी उत्तम आहे.

+

## माहे जानेवारी १९५०

या महिन्यांत बाहेर गांवचे भक्त नेहमींप्रमाणें श्रींचे दर्शनास आले होते.

**देणगीः**—या महिन्यांत २४ भक्तजनांकडून निरानिराळ्या प्रकारचे जिन्नस देणगी-दाखल आले आहेत.

**धर्मकृत्यः**—अभिषेक, लघुरुद्र, अर्चन, पूजा, नैवेद्य, आरती, ब्राह्मणसुवासिनी भोजन व अन्नदान वगैरे धर्मविधी नेहमींप्रमाणें झाले. तीन भक्तांनीं श्रीमंदिरांत श्रीसत्यनारायणाच्या पूजा केल्या.

## कीर्तन

संस्थान गवई यांचें एक कीर्तन या महिन्यांत झालें. तसेंच बाहेर गांवचे कीर्तन-कार श्री. ह. भ. प. पोपट बुवा लोहेणकर, ह. भ. प. महादेवबुवा खरवडीकर तसेंच कीर्तनाविशारद कृष्णाबाई चरेगांवकर यांचेंहि कीर्तन झालें.

## नवलविशेष

२६ जानेवारीस प्रजासत्ताक स्वातंत्र्यदिन साजरा करण्यांत आला. त्या दिवशीं श्रीमंदिराजवळ ध्वजारोहण समारंभ करण्यांत आला. रात्रौ रोषणाई वगैरे केली होती व त्या दिवशीं सर्व संस्थान नोकरांस आनंदाप्रीत्यर्थ भोजनाचा कार्यक्रम केलेला होता. शिवाय श्रीचें रथाची मिरवणूक काढण्यांत आली. त्या रात्रीं वे. शा. सं. गजानन विश्वनाथ जोशी, कोपरगांवकर भजनमंडळीचें संगीत भजन झालें; व पं. जगन्नाथबुवा सुरतकर, श्री. व्यास बुवा वेशीकर, श्री. रामकृष्णबुवा सोमण, सोलापूर, श्री. दिगंबरबुवा सोलापूरकर, श्री. माधवराव खलेकर, सोलापूर, श्री. रामदास नायडू, सोलापूर वगैरे कलावंतांनी गायन, वादन, फिडल, तबला, हार्मोनियम वगैरेंची हजेरी दिली. श्री. दामुअण्णा बेलापूरकर यांनी सनईवादनाची हजेरी दिली.

इलेक्ट्रिक पावर हाऊस व इतर दुरुस्ती बांधकामें चालू आहेत.

शिरडीची हवापाणी उत्तम आहे.

सेक्रेटरी
**श्रीसाई संस्थान, शिरडी**

## शिरडींतील सुधारणा

पूर्वी शिरडींत, साठेवाडा, दिक्षीतवाडा व समाधीमंदिरांतील वरच्या खोल्या यांत भक्तांची रहाण्याची सोय केली जात असे. पण या जागा शिरडीला जाणाऱ्या भक्तांच्या मानानें अगदींच अपुऱ्या व बिनसोयीच्या होत असत. उत्सवाच्या वेळीं तर भक्तगणास फारच त्रास सोसावा लागत असे. भक्तांचा थोडासा त्रास कमी करावा

म्हणून संस्थान कमिटीनें १९४६ सालीं भक्तांच्या सोईकरतां श्रीमंदिरापुढील जागेत दोन चाळी बांधल्या. त्यापैकीं एक दोन मजली असून त्यांत पंधरा खोल्यांची सोय आहे व दुसरी एक मजली असून त्यांत दहा खोल्यांची सोय असून पाठीमागच्या बाजूस पांच जागा दुकानांकरतां ठेवलेल्या आहेत. नंतर १९४७ सालीं संस्थाननें श्रीमंदिराच्या दक्षिणेस तिसरी एक पांच खोल्यांची चाळ बांधून काढून त्यांतील प्रत्येक खोलीला स्वयंपाकगृहाची स्वतंत्र व्यवस्था करण्यांत आली आहे. त्यामुळं हातानें ( स्वतः ) स्वयंपाक करणाऱ्या भक्तांची फार चांगली सोय झाली आहे. या चाळीपासून २०–२५ फुटांवर एक विहीर बांधून त्या चाळींत रहाणाऱ्या लोकांची पाण्याची सोय केली आहे.

बाहेरून येणाऱ्या भक्तांची स्नानाची सोय संस्थाननें नवीन आठ बाथरुम्स ( स्नानगृहें ) बांधून केलेली आहे. उत्सवाच्या वेळीं गर्दी फार होत असल्यामुळें आणखी चार संडास पूर्वीच्या संडसाजवळच बांधले असून त्यांत स्त्रियांची स्वतंत्र सोय केलेली आहे.

संस्थाननें भक्तांच्या सोईसाठीं एक दवाखाना काढला असून त्यांतून शक्य तों सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याची सोय संस्थान हळूहळू करीत आहे.

शिरडींत आतां कांहीं दिवसांनीं विजेच्या बत्त्यांचा लखलखाट झालेला दिसेल. पावर हाऊस बांधण्याचें काम चालू आहे.

इतकें करूनही उत्सवाचे वेळीं जागा अगदींच अपुरी पडते. त्यासाठीं संस्थान-कमिटी आणखी जागा बांधण्याचे विचारांत आहे.

---

## " श्री तुकयाचा पाळणा "

**( श्री साई चरणीं अर्पण )**

जो–जो–जो–जोरे, कुलभूषणा श्री तुकया, ।
बाळा, जो–जो–जो–जो–रे, ॥ ध्रु० ॥
कुळिं दाहाव्या घेतलासि आवतार ।
" पांऽडुरंग " मनीं स्मरणार ॥
तव जन्मानें मानितें धन्य मी मजला ।
आयुष्य, वाढो बाळाला, ॥ १ ॥ जो० ॥
भू–लोकिं असो, भागवतीं जाग्रतीं ।
बाळा तूं करसिल पुढतीं ॥
मम बाळ पहा ! दिसतं गोजिरवाणं ।
संतांचा जणुं जीव कीं, प्राण ! ॥ २ ॥ जो० ॥

जगिं वावरतां होशील सदा उदास ।
मम हृदयीं ही मोठी आस ॥
रे, निज आतां श्रमलासी तूं फार ।
" कनकाईचें " भाग्यचि थोर ॥ ३ ॥ जो० ॥
पहा बागुलवा पातला तुला भिववाया ।
स्वस्थ जा झोंपिं तूं सखया ॥
तूं काळाचा काळ होउनी येसी ।
बागुलवा त्या कैसा भीसी ! ॥ ४ ॥ जो० ॥
" विठ्ठल विठ्ठल " या नामा तूं जपशील ।
कुळिं जगीं धन्य होशील ॥
पहा ! पहा ! बायांनों, बाळचि झोंपी गेला ॥
लागते आतां धंद्याला ॥ ५ ॥ जो० ॥
या नामाचें वांटितें मी " साखर पान " ।
तुम्हि समद्या, घ्या ग प्रेमानं ॥
या तुकयानें " नरहरी " गीत हा गाई ।
डोइ ठेवुनि चरणा ठायीं ॥ ६ ॥ जो० ॥

[ अनन्तात्मज ]

## " आरती-तुकयाची "

( चाल—आरती-श्री पांडुरंगाची )

" श्री साईचरणीं अर्पण "

जयदेव जयदेव जय तुकया देवा ।
ओंवाळूं आरती करुनी तव सेवा ॥ जय० ॥ ध्रु० ॥
शूद्र यातीमाजी जन्मा येवोनी ।
विश्वोद्धारक कार्या तनु-मन अर्पूनी ॥
विश्वंभर बाबा कुल तें धन्यचि होवोनी ।
पंढरिनाथा वश केलें वैष्णव विरवनुनी ॥ १ ॥ ध्रु० ॥
ऋषि-मुनिजन-सुरवर यांची स्वर्गांत दाटी ।
निर्णय लावुनि ठरला नामा तुका साठीं ॥
अवतरला तुकया बोल्होबा कनकाई पोटीं ।
वैकुंठीं उल्हास-सर्वांच्या पोटीं ॥ २ ॥

जगराहाटीनुरूप संसार केला ।
ऐसा भास झाला येथील जगताला ॥
विदेह वैराग्याचा अनुभव साधू संताला ।
म्हणुनी तद्रुप झाला त्याच्या स्वरुपाला ॥ ३ ॥ ॥धृ० ॥

भोडारीं, भांबी केला खडतर एकांत ।
अवली संगें भेटे श्री पंढरीनाथ ॥
त्यांच्या संगें भोजन केलें मनसोक्त ।
भक्तीचा पाया झाला यात्री–लोकांत ॥ ४ ॥

चिंतामणि, मंबाजीचा गर्व हरपला ।
विठ्ठल–गणेश एका पंक्ती जेवविला ॥
जगीं तुकयाचा महिमा वाढत चालला ।
सच्चिदानंद तुम्हांसी आजी पावला ॥ ५ ॥

रामेश्वर द्वेषापायीं ग्रंथ बुडवीले ।
रघुनाथें ते तेरा दिवस रक्षीले ॥
दृष्टांत देउनि त्यांनीं जगता जागविले ।
इंदायणिमधुनी ते वरतीं काढीले ॥ ६ ॥

आपुली कीर्ती ऐकुनि शिवबा वीरक्त झाला ।
मातेच्या हेतूस्तव बोधामृत दिधला ॥
यवनांचें संकट हरण्या विठ्ठल कीर्तनि लाभला ।
अगाध महिमा झाला भक्ती कळसाला ॥ ७ ॥

वैकुंठीं हुरहुर लागे रुक्मिणिरमणाला ।
म्हणुनी इंद्रायणि तटिं तुकया बोधीला ॥
बोधामृत पाजुनि तुकया या भूलोकाला ।
नरहरि सांगे तुकया...वैकुंठीं गेला ॥ ६ ॥

[ अनन्तात्मज ]

## विनंति

( १ ) श्री साई–लीला त्रैमासिक आज १९५० सालांत पदार्पण करीत आहे. आपण सार्वांनीं, लेख, कविता, अनुभव, वगैरे संपादकाकडे पाठवून तिला अलंकृत करणें. मासिकाचें वर्ष जानेवारी पासून धरल्यामुळें सर्व सभासदानीं आपआपली वर्गणी रु. २ आणे ४. मॅनेजर शिरडी संस्थान शिरडी, जि. अहमदनगर येथें पाठवावी.

( २ ) दाभोळकर कृत 'श्री सत् चरित्र' व हतर पुस्तकें मुंबईतें. रा. रा. विनायक शामराव कितींकर, २१३ धन म्यानशन, चर्नी रोड मुं. ४ येथें मिळतील.

# श्री साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र ( मराठी ) .... .... | ७–०–० |
| २ | सच्चरित्र ( इंग्रजी ) .... .... | ४–०–० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी .... | ०–२–० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] .... | ०–८–० |
| ५ | सगुणोपासना .... .... .... | ०–३–० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक ( इंग्रजी ) .... .... | १–४–० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर**

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक :-डॉ. के. भ. गव्हाणकर यांनीं, काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक :-के. एन्. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, मुंबई ४